<u>तक्रार (यूएलपी) क्र.२४७/२०१७ (२५/०७/२०१८)</u> <u>निशाणी क्र.यू–४८</u>

<u>सामनेवालेतर्फे श्री.ए.आर.जोशी, वकील यांचेकडून पुढील उलटतपास चालू</u>

मला धरून २६ कर्मचा–यांना कमी केले आहे. त्यांची नावे सदरच्या तक्रारीत आहे.

हे म्हणणे खरे आहे की बेल्ट सेटींग हा ऑरेटरच्या कामाचा भाग आहे. तसेच लाईनर वायडिंग करायचे काम त्याचे असते. तसेच प्रोडॅक्शन मध्ये ग्रील बेल्ट तयार असतो व त्यावर होल पाडायचे काम ऑपरेटर करतो. तसेच मशीन मध्ये बेल्ट गेला व ते ओढायचे कामसुध्दा ऑपरेटरला करावे लागते. तसेच प्लॅटर वरती मोल्ड रीलीज स्प्रे ॲपलिकेशनचे काम सुध्दा ऑपरेटरला करावे लागते. प्रेसमध्ये बेल्ट ओढायचे काम वॉयडर बरोबर ऑपरेटर करतो. हे म्हणणे खरे आहे की, बेल्ट क्यूअर झाल्यावर अनलोड करायचे काम देखील ऑपरेटर करतो. शेल सेटींगचे काम देखील ऑपरेटरला करावे लागते. हे म्हणणे खरे आहे की सॅम्पल बेल्ट कटींग करून QAD ला पाठविला जातो. हे म्हणणे खरे आहे की बेल्टच्या आजूबाजूस पडलेले मटेरिअल असते ते कापण्याचे काम सुध्दा ऑपरेटर असते. हे म्हणणे खरे आहे की इलाईट क्लीनिंगचे काम सुध्दा ऑपरेटरला करावे लागते. तसेच या सर्व प्रक्रियातून स्क्रॅप निर्माण होते व ते स्क्रॅप यार्डात पाठविण्याचे काम ऑपरेटरचे आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की प्रेस एरिया जवळील स्वच्छता करण्याचे काम देखील ऑपरेटरला करावे लागते. (साक्षीदार स्वत: सांगतो की मशीन पुरता भाग ऑपरेटर स्वच्छ करतो). हे म्हणणे खरे आहे की edge आर्यन बार्स हे स्टॅंडवर ठेवायचे काम ऑपरेटरला करावे लागते. प्लॅटर क्लीनिंग फारमॅटीक्स सेंडर हे काम ऑपरेटरला करावे लागते.

हे म्हणणे चुकीचे आहे की मला डेली प्रोडॅक्शन प्लॅन माहीत असे. हे म्हणणे चुकीचे आहे की सदर डेली प्रोडॅक्शन प्लॅन चा रीव्हीयू घेण्याचे काम मी करत असे. वर्क ऑर्डर म्हणजे पूर्ण माहीती नाही. परंतु बेल्ट नंबर आणि बेल्टचे स्पेसीफीकेशन एवढे माहीत आहे. ग्रीन बेल्ट म्हणजे कच्चा बेल्ट. हे म्हणणे खरे आहे की ग्रीन बेल्ट ऑपरेटर मशीन मध्ये लोड करतात. PLC & SCADA मला माहीत नाही. हे म्हणणे चुकीचे आहे की PLC & SCADA चे पॅरामीटर्स मी सेट करायचो. हे म्हणणे खरे आहे की ग्रीन बेल्ट क्युअरींग ज्या

औद्योगिक न्यायालय

त्या वेळेस इन्सपेक्ट करावे लागायचे. हे म्हणणे खरे आहे की thickness आणी width ग्रीन बेल्ट व क्युअर बेल्टचे ते काम सुध्दा मी करत असे. हे म्हणणे चुकीचे आहे की प्रेस मधले मेजर गॅप्स मी बघत असे. हे म्हणणे खरे आहे की प्रेशर टेंपरेचर आणि प्रेस चेक आणि मॉनिटर पॅरामीटर मी पाहत असे. हे म्हणणे खरे आहे की प्रेस डेव्हियेशन काही आल्यावर वरिष्ठास सांगून काम थांबावावे लागत असे. सॅम्पल हे QAD ला आम्हीच देत असो.

वेळेअभावी उलटतापस पुढील तारखेपर्यत तहकूब.

Sd/-

(एम. आर. कुंभार)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, पुणे

पुणे
दि. २५/०७/२०१८

औद्योगिक न्यायालय